MHKO100008872014

**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. २१२/२०१४</u>**

मारुती रामा पाटील
/वि/
सुनिल भिमराव गिलबिले वगैरे.

**<u>निशाणी क्र. ५२ आणि ५३ वर आदेश</u>**

प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जांद्वारे प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) मारुती रामा पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होणेसाठी व दावा अवसानाचा (अबेटमेंट) आदेश रद्द होऊन मिळणेसाठी विनंती केलेली आहे. प्रतिवादी (मुळ वादी) तर्फे अर्जांचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा प्रतिदावा हा करारपत्रावरुन खरेदीपत्र पुर्ण होऊन मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) मारुती रामा पाटील हे दिनांक ०३/०९/२०१७ रोजी मयत झालेले आहेत व प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०८/१२/२०२३ रोजी दाखल केलेला आहे. मुदतीचे अधिनियम १९६३ चे आर्टीकल १२० प्रमाणे वादीने, प्रतिवादीच्या मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांमध्ये वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. तसेच, मुदतीत वारस अभिलेखावर न घेतल्यास आदेश २२, नियम ४ प्रमाणे तो दावा मयत प्रतिवादीविरुध्द दावा अवसान (Abate) होतो. आदेश २२, नियम ४ (५) (ब) प्रमाणे वादी उशिराबाबत संयुक्त कारण दाखवत असेल तर न्यायालयाला विलंब माफ करुन वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देता येईल.

०३. त्याप्रमाणे प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांना बराच विलंब झालेला आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी विलंबाकरीता संयुक्त कारण दिलेले आहे का हे पाहणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दावा प्रलंबीत असताना प्रतिदाव्यातील प्रतिवादी हे (मुळ वादी) मयत झालेनंतर त्यांचे वारस दावेचे कामी हजर झाले. मात्र ते सदरहु दावेचे चौकशी कामी न्यायालयात हजर राहत नव्हते. त्यामुळे, न्यायालयाने मुळ दावा व त्यासोबत प्रतिदावाही काढून टाकला. म्हणुन, प्रतिवादी यांनी सदरचा प्रतिदावा पुन्हा फैलावर घेणसाठी किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३७/२०२२ चा दाखल केला होता.

सदरचा अर्ज मे. न्यायालयाने मंजुर केल्याने प्रतिवादी यांचा प्रतिदावा फैलावर घेणेत आला. त्यामुळे, मयताचे वारस अभिलेखावर आणणेस विलंब झालेला आहे. तसेच, किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३७/२०२२ चे कामी मयत प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) यांचे वारस हे पक्षकार असलेने त्यांना पुन्हा सदर दावेचे कामी अभिलेखावर आणावे लागते याचे कायदेशिर ज्ञान नव्हते. त्यामुळे, त्यांना वारस अभिलेखावर आणणेसाठी विलंब झालेला आहे अशी कारणे नमुद केलेली आहेत. सदर कारणे व विलंबाचा काळ पाहता प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तीक होत नाहीत. परंतु, प्रतिदाव्याचे स्वरुप पाहता प्रकरणाची गुणदोषावर निर्गती करण्याकरीता प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) मारुती रामा पाटील यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. त्यामुळे, त्यांना अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करणे व अबेटमेंटचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी यांचेवर अर्जाचा खर्च ठेवून त्याची भरपाई प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांना देणे योग्य होईल. सबब, मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

०१. अर्ज रक्कम रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येत आहेत.

०२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) मारुती रामा पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन दावा अवसानचा (अबेटमेंट) आदेश रद्द करण्यात येत आहे.

( खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला )

Digitally signed by RATHOD SUJIT
Date: 2024.10.03 17:40:34 +0530

( एस. ए. राठोड )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०१/१०/२०२४.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 01/10/2024 |
| Order signed by P.O. on | 01/10/2024 |
| Order uploaded on | 03/10/2024 |